## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०११

### आदेश

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१.**

क्रमांक आरसीटी-०३११/प्र.क्र.२२८/पोल-५अ.—मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम-५(ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २००६ अधिक्रमित करुन याव्दारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील " पोलीस शिपाई " या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे, जसे :—

१. या नियमांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " विभाग " म्हणजे शासनाचा गृह विभाग;

(ब) " महासंचालक " म्हणजे पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई;

(क) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन;

(ड) " पोलीस दल " म्हणजे मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम-३ अन्वये विहित करण्यात आलेले पोलीस दल.

३. (१) पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील निवडीसाठी उमेदवारांकडे खालील नमूद वय, शैक्षणिक व शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :—

(अ) वय.—कमीत कमी १८ वर्षे जास्तीत २५ वर्षे *(मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाने वेळोवळी ठरविलेल्या धोरणानुसार उच्चत्तम वयोमर्यादत सूट देय राहिल.)*

(ब) शैक्षणिक अर्हता.—महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

(क) शारीरिक पात्रता.—

| | | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|---|
| (*i*) उंची | .. | १५५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. |
| (*ii*) छाती | .. | .... | न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

**(२) शैक्षणिक व शारीरिक पात्रतेत द्यावयाची सूट**

(अ) नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद.—

(अ) शैक्षणिक अर्हता.—शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीण झालेले आहेत ते भरती करता पात्र ठरतील. मात्र असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाहीत.

(ब) शारीरिक पात्रता.— शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नक्षलवादीविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार अथवा पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी याच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :-

(*i*) उंची : २.५ सें.मी.महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(*ii*) छाती : छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

(क) या नियमातील उप खंड (अ) व (ब) नुसार विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व शारीरिक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत शिथिल करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

(ड) शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील पोलीस भरतीच्या वेळी स्थानिक आदिवासी भागात बोलली जाणारी बोली भाषा (Local Tribal dialect) अवगत असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(ब) पोलीस बँड.—

(अ) शैक्षणिक अर्हता.— बँड पथकासाठी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण.

(ब) शारीरिक पात्रता.— बँड पथकाच्या भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या बाबतीत या नियमाच्या उपनियम (१) च्या खंड (क), उपखंड (i) व (ii) मध्ये विहित केलेल्या शारीरिक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील :—

(*i*) उंची : २.५ सें.मी.

(*ii*) छाती : २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

(क) अनुभव व इतर अटी.— (*i*) बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक राहिल.

(*ii*) पोलीस बँड पथकातील उमेदवार निवडीसाठी गठित करावयाच्या समितीत शक्यतो भारतीय सैन्य दलाच्या बँड पथकातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

(*iii*) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयातील अन्य कर्तव्यही बजावणे आवश्यक राहिल.

(*iv*) पोलीस बँड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील.

***(क) खेळाडू प्रवर्ग.***— आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पुरुष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सूट देय राहिल.

***(ड) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियाबाबत.***—पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणांमुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :—

(अ) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ब) छाती : २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

**खुलासा.**—पात्र नातेवाईक यामध्ये पोलीस कर्मचाऱ्याच्या खालील कुटुंबियांचा समावेश आहे :

(अ) पती/पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी

(ब) अविवाहीत पोलीस कर्मचाऱ्याच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा अविवाहीत भाऊ अथवा बहिण

(क) मृत पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून

४. **(१) शारीरिक चाचणी (१०० गुण).**—जे उमेदवार विहित शारीरिक व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असतील अशा उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण १०० गुणांची असेल.

(अ) पुरुष उमेदवार

| | | |
|---|---|---|
| (अ) ५ कि.मी.धावणे | .. | २० गुण |
| (ब) १०० मी.धावणे | .. | २० गुण |
| (क) गोळा फेक | .. | २० गुण |
| (ड) लांब उडी | .. | २० गुण |
| (ई) १० पुल अप्स | .. | २० गुण |
| एकूण | .. | १०० गुण |

**(ब) महिला उमेदवार**

| | | |
|---|---|---|
| (अ) ३ कि.मी.धावणे | .. | २५ गुण |
| (ब) १०० मी.धावणे | .. | २५ गुण |
| (क) गोळा फेक (४ कि.ग्रॅ.) | .. | २५ गुण |
| (ड) लांब उडी | .. | २५ गुण |
| एकूण | .. | १०० गुण |

**(२) लेखी चाचणी (१०० गुण).**—

(अ) जे उमेदवार शारिरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना १०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

(ब) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :—

(*i*) अंकगणित

(*ii*) सामान्यज्ञान व चालू घडामोडी

(*iii*) बुद्धीमत्ता चाचणी

(*iv*) मराठी व्याकरण

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील.

***स्पष्टीकरण.***— जे उमेदवार शारीरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १५० (१५ x १० = १५०) उमेदवार व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ७५ (१५ x ५ = ७५) उमेदवार लेखी चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढया अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीसाठी पात्र असतील. तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ७५ व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढया अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळाले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीसाठी पात्र असतील.

(३) महासंचालकांनी प्रत्येक पोलीस घटकासाठी गठित केलेले निवड मंडळ या नियमाच्या पोटनियम (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या दोन निकषांवरुन प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/ १६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल.

५. **चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी.**—पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येऊ नये तसेच त्यांना प्रशिक्षणासाठीही पाठविण्यात येऊ नये. ज्या उमेदवारांविरुद्ध गुन्हा दाखल आहे अथवा खटला न्यायप्रविष्ट आहे किंवा ज्या उमेदवारांविरुद्ध दाखल खटल्यातून उमेदवारांची भरतीपूर्वी किंवा भरतीनंतर निर्दोष मुक्तता झालेली आहे अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यात येऊ नये. अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भातील सर्व प्रस्ताव शासन स्तरावर गठित उच्चस्तरीय समितीपुढे विनाविलंब विचारार्थ सादर करणे नियुक्ती प्राधिकाऱ्यावर बंधनकारक राहिल.

६. **वैद्यकिय तपासणी.**—निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकिय तपासणी संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदी लागू होतील. याशिवाय वैद्यकिय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णांधतेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग व महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या वैद्यकिय चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्यांमध्ये उमेदवारात दोष आढळल्यास अथवा उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

७. पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदाच्या भरतीसाठी संबंधित सेवायोजन कार्यालय किंवा समाजकल्याण अधिकारी किंवा जिल्हा सैनिक बोर्ड किंवा आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या संबंधित कार्यालयाकडून तसेच सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी भाषेतील मोठया प्रमाणावर प्रसारण असलेल्या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच प्रसार माध्यमातून प्रसिद्धी देऊन उमेदवारांची नावे /अर्ज मागविण्यात येतील. याव्यतिरिक्त भरतीबाबतची माहिती पोलीस वेबसाईट आणि पोलीस कार्यालयातील नोटीस बोर्डवर दिली जाईल. तसेच रेडिओ, दूरदर्शन, रोजगार वार्तापत्र आणि वर्तमानपत्रात दिली जाईल. राज्यात सर्व पोलीस घटकांमध्ये एकाचवेळी भरती प्रक्रिया सुरु करण्यात येईल. पोलीस महासंचालक हे भरती प्रक्रियेचा दिनांक निश्चित करतील. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांनी विहित केलेले अर्ज प्रत्येक उमेदवाराने पोलीस शिपाई पदासाठी भरणे अनिवार्य राहिल. यासाठीचे अर्ज सर्व पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षक/समादेशक, राज्य राखीव पोलीस बल/तालुका पोलीस ठाणे यांच्या कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील. पोलीस भरती प्रक्रिया कशा प्रकारे राबविण्यात येईल, यासंदर्भात शासनाने वेळोवेळी विहित केलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात येईल.

८. **आरक्षण.—(*i*) खेळाडू प्रवर्ग.**— शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार उपलब्ध पदांच्या ५ टक्के पदे खेळाडुंसाठी राखीव असतील. सदर आरक्षण शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक-राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल २००५ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल.

**(*ii*) महिला.**—पोलीस शिपाई पदांवरील भरतीकरिता उपलब्ध असलेल्या एकूण पदांच्या ३० टक्के पदे महिलांसाठी राखीव असतील. सदर आरक्षण महिला व बाल कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक-८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल.

**(*iii*) गृहरक्षक दल (*Home Guards*).**—पोलीस शिपाई पदांवर नियुक्ती करताना एकूण पदांच्या ५ टक्के पदे होमगार्डमध्ये जाहिरातीच्या दिनांकास कमीत कमी ३ वर्ष (१०९५ दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व या नियमानुसार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील होमगार्डसमधून भरण्यात येतील.

(*iv*) माजी सैनिक, धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त व इतर विविध घटकांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार आरक्षण लागू राहिल.

(*v*) या नियमात विहित करण्यात आलेल्या सर्व प्रवर्गातील उमेदवारांना पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक राहिल आणि या पदासाठी शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये विहित केलेले गुण मिळवावे लागतील.

९. **अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती.**—अनुकंपा नियुक्तीच्या योजनेसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

मात्र यासंदर्भात पात्र उमेदवारांसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारीरिक पात्रता शिथिल करण्यात येईल :—

(*i*) उंची : २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(*ii*) छाती : २ सें.मी. न फुगविता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

१०. पोलीस शिपाई या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तिला, उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

११. पोलीस शिपाई पदावर उमेदवारास ज्या घटकात नियुक्ती देण्यात आलेली आहे त्या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात त्याची बदली करता येणार नाही.

१२. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधित परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये तो परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाहीत.

१३. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सदानंद जाधव,**
शासनाचे उपसचिव.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ४] शुक्रवार, जानेवारी ८, २०१६/पौष १८, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जानेवारी २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक आरसीटी. ०३१२/प्र. क्र. २२८/पुनर्बांधणी-१६६/पोल-५अ.—मुंबई पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारितील पोलीस दलातील पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम-४(१) (अ) (अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

" १६०० मीटर धावणे .................... २० गुण "

३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम-४(१) (ब) (अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

" ८०० मीटर धावणे .................... २५ गुण "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय द. खेडेकर,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th January 2016

**Order**

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCT. 0312/CR.228/Reconstruction-166/Pol-5A.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Mumbai Police Act (Mumbai XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby amending the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 rules regulating recruitment to the post of Police Constables in the police force under the Home Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the " Maharashtra Police Constable (Recruitment) (Amendment) Rules, 2016 ".

2. The following changes should be done in rule 4 (1) (A) (a) of the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 :—

" 1600 Meter running ...................... 20 Marks "

3. The following changes should be done in rule 4 (1) (B) (a) of the Maharashtra Police Constable (Recruitment) rules, 2011 :—

" 800 Meter running ...................... 25 Marks "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY D. KHEDEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक २३(२)] मंगळवार, फेब्रुवारी २३, २०१६/फाल्गुन ४, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३८

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ फेब्रुवारी २०१६

### आदेश

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक आरसीटी–०३१२/प्र. क्र. २२८/पुनर्बांधणी-१६६/पोल-५अ.—मुंबई पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) च्या कलम ५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (१)(अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

" वय—कमीतकमी १८ वर्षे राहील, खुल्या प्रवर्गाकरिता जास्तीतजास्त २८ वर्षे राहील, मागासवर्गीय प्रवर्गाकरिता जास्तीतजास्त ३३ वर्षे राहील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय द. खेडेकर,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 22nd February 2016

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCT-0312/C.R. 228/Reconstruction-166/Pol-5A.—In exercise of the powers conferred by clause (b) of section 5 of the Mumbai Police Act (Mumbai XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby amending the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 rules regulating recruitment to the post of Police Constables in the police force under the Home Department of the Government of Maharashtra namely :—

1. These rules may be called the "Maharashtra Police Constable (Recruitment) (Amendment) Rules, 2016."

2. The following changes should be done in rule 3 (1)(A) of the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 :—

"Age—Minimun 18 years, Maximum 28 years, for Open Category and 33 years for Backward Class".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY D. KHEDEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

Add. D.G.P. (Trg.)
I.G.P. (Trg.)
Dr. C.S. (Trg.)
D.S. (Trg.)
Dated. 23 MAR 2016
Inward No.



पोलीस शिपाई भरती
माजी सैनिकांना शारिरीक
पात्रतेत सवलती देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:पोलीस-१८१६/प्र.क्र.६०/पोल ५ अ
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक:१० मार्च,२०१६.

629/16

वाचा:- (१) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक:आरसीटी-०३०९/प्र.क्र.६९२/पोल ५ अ, दिनांक ९ सप्टेंबर,२०११.
(२)अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक:प्रशि/पोशि-भरती १५-१६/मा.सै.स./३६/२०१६/६६९,दिनांक १० फेब्रुवारी,२०१६.

**प्रस्तावना:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील कलम ४ (१) (अ) मध्ये पुरुष उमेदवारांना ८०० मीटर धावणे ऐवजी ५.०० कि.मी.धावणे ही नवीन तरतूद करण्यात आली होती. त्यानुषंगाने राज्यातील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांसाठी शारिरीक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचा दिनाक ९ सप्टेंबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये घेतला होता:-

| अ.क्र. | शारीरिक चाचणी परीक्षा | माजी सैनिकांना सवलत |
|---|---|---|
| १ | ५ कि.मी.धावणे | + ७ मिनिटे |

आता दिनांक ७-१-२०१६ च्या आदेशाव्दारे महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम क्रमांक ४ (१) (अ) (अ) तसेच नियम क्रमांक ४ (१) (ब) (अ) मधील शारिरीक चाचणी परिक्षेमध्ये पुरुष उमेदवारांसाठी ५ कि.मी. धावणे ऐवजी १६०० मीटर धावणे व महिला उमेदवारांसाठी ३ कि.मी..धावणे ऐवजी ८०० मीटर धावणे अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शारिरीक पात्रतेत माजी सैनिकांना सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील कलम ४ (१) (अ)

मध्ये माजी सैनिकांना खालीलप्रमाणे सवलत देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:-

| अ.क्र. | शारीरिक चाचणी परीक्षा | माजी सैनिकांना सवलत |
|---|---|---|
| १ | १६०० मीटर धावणे | + २.३० मिनिटे |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सं.द.खेडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
संचालक, माजी सैनिक विभाग,पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
आयुकत,राज्य गुप्तवार्ता विभाग,मुंबई
कक्ष अधिकारी (का-१६ अ) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती/का-पोल ५ अ

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १०५ (२)] शनिवार, ऑगस्ट २०, २०१६/श्रावण २९, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २१५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जुलै २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक आरसीटी-०३१२/प्र.क्र. २८८/पुनर्बांधणी-१६६/पोल-५अ.— मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात अस्तित्वात असलेले पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ (ज्यास यापुढे मुख्य नियम असे संबोधण्यात आले आहे) मधील नियम ३ (१) (क) नंतर खालीलप्रमाणे उपखंड (ड) समाविष्ट करण्यात यावा :—

" (ड) अन्य अर्हता-पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु, सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्याचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्यात येईल व या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येतील. याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील. "

३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (२) (अ) मधील (ब) (i) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

" उंची : ४.०० से.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी "

४. मुख्य नियमाच्या नियम १२ नंतर खालील नियम, नियम १३ म्हणून अंतर्भूत करण्यात यावा :—

" नियम १३ : नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. "

५. मुख्य नियमातील नियम १३ हा नियम १४ म्हणून संबोधण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुरेश खाडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

2nd Flr., Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 27th July 2016

### Order

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCT.0312/CR 228/Reconstruction-166/Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section-5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra makes the following rules further to amend the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2016.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constable (Recruitment) Rules, 2011 (hereinafter referred to as "the Principal Rules") in sub-rule (i) after clause (*c*) the following clause shall be inserted namely :—

"(D) Other qualification—A candidate who apply to the post mentioned in Rule 3 is required to possess Light Motor Vehicle (LMV) license as prescribed in section 2 (21) of Motor Vehicle Act, 1988 issued by Competent Authority (Regional Transport Officer) at the time of submitting application. Provided, a candidate who does not possess such license, he/she shall be required to possess a license within two year after completion of his/her training and if he/she fails to possess the license, then his/her appointment will be considered as cancelled and he/she shall be liable to be terminated from service."

3. In rule 3 of the Maharashtra Police Constables (recruitment) Rules, 2011, in sub-rule (2) in clause (*A*), for sub-clause (*b*) (*i*), the following sub-clause shall be substituted, namely:—

"Height : 4.00 centimeters for male and female candidates."

4. After rule 12 of the Principal Rules, the following rule shall be inserted as a Rule 13 namely :—

"Rule 13 : A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to possess a certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time."

5. Rule 13 of the Principal Rules shall be renumbered as Rule 14.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURESH KHADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

४२७

Add. D.G.P. (Trg.)
I.G.P. (Trg.)
Sr. O.S. (C)
O.S. (Trg.)
Dated. - 2 APR 2018
Inward No. 1318/18

आदेश

**गृह विभाग**
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२,
दिनांक : २३ मार्च, २०१८

महाराष्ट्र पोलीस अधिनियम

क्रमांक:सेप्रनि-१५१७/प्र.क्र.२४१/पोल-५अ :- **मुंबई पोलीस अधिनियम, १९५१** (१९५१ चा २२) च्या कलम ५ (ब) आणि त्या अनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. (१) या नियमांना "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१८" असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ मधील पोटनियम (२) मधील खंड (अ) मधील उपखंड (ड) च्या नंतर खालीलप्रमाणे उपखंड समाविष्ट करण्यात यावेत :-

"**(इ)** गडचिरोली जिल्हयातील पोलीस भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल."

**(फ)** गडचिरोली जिल्हयामध्ये राहणाऱ्या उमेदवारांनाच गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीमध्ये भाग घेता येईल. सदर उमेदवारांना प्रचलित नियमानुसार संबंधित तहसिलदार यांनी दिलेला वास्तव्याचा दाखला (Residential certificate) जोडणे आवश्यक राहिल.

**(ग)** असे उमेदवार गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीपात्र असणार नाहीत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या
आदेशानुसार व नावांने,

(व्यं. मा. भट)
शासनाचे उप सचिव

Scanned by CamScanner

प्रत:

१) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक,
४) सर्व पोलीस आयुक्त,
५) सर्व पोलीस उपमहानिरीक्षक,
६) सर्व पोलीस अधीक्षक,
७) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
८) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) विधि व न्याय विभाग (ब शाखा), मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी (विशा-१ब), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

Add. D.G.P. (Trg.)
I.G.P. (Trg.)
2 APR 2018
13/7/18

# ORDER

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya,
Mumbai 400032,
Dated the 23rd March, 2018

Maharashtra Police Act

NO.RCT-1517/C.R.241/POL-5A – In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act, 1951 (XXII of 1951) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :-

1. (1) These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2018.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, in sub-rule (2), in clause (A), after sub-clause (d), the following sub-clauses shall be added, namely:-

"(e) Candidate who apply for Gadchiroli District police constable recruitment, shall require to appear in an additional 100 marks written examination of Gondi and Madiya languages.

(f) Only those candidates who are residing in Gadchiroli District shall be eligible to participate in the Gadchiroli District police constable recruitment. The said candidates shall attach the residential certificate issued by the concerned Tahsildar as per prevailing rules.

(g) These candidates shall not be entitled to transfer outside the Gadchiroli District."

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

(V.M.Bhat)
Deputy Secretary to Government

Scanned by CamScanner

Copy to :

1) The Director General & Inspector General of Police, Maharashtra Sate, Mumbai.
2) The Additional Director General of Police, Training and Special Unit, Maharashtra Sate, Mumbai.
3) All Commissioner of Police.
4) All Range Inspector General of Police.
5) All Deputy Inspector General of Police.
6) All Superintendent of Police.
7) All Commandant, State Reserve Police Force.
8) General Administration Department, Manatralya, Mumbai.
9) Law & Judiciary Department (B Branch), Manatralya, Mumbai.
10) Desk Officer (Spl-1B), Home Department, Mantralya, Mumbai.

Scanned by CamScanner

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८५]    शुक्रवार, जून २४, २०२२/आषाढ ३, शके १९४४    [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २३ जून २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक - सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३(भाग-२)/पोल-५अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा मुंबई अधि.२२) याच्या कलम ५ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याच्या वतीने त्यास समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता पुढील नियम करीत आहेत :-

१. या नियमास, "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (पहिली सुधारणा) नियम, २०२२" असे म्हणावे.

२. "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ याच्या नियम ४ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :-

**"४. (१) शारीरिक चाचणी (५० गुण) :-**

जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करतात अशा उमेदवारांनी शारीरिक योग्यता चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक असेल.

शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल :-

| | **(अ) पुरुष उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|
| (क) | १६०० मीटर धावणे. | २० |
| (ख) | १०० मीटर धावणे. | १५ |
| (ग) | गोळाफेक | १५ |
| | एकूण | ५० |

| | **(ब) महिला उमेदवार** | **गुण** |
|---|---|---|
| क) | ८०० मीटर धावणे. | २० |
| ख) | १०० मीटर धावणे. | १५ |
| ग) | गोळाफेक | १५ |
| | एकूण | ५० |

**(२) लेखी चाचणी (१०० गुण) :-**

(अ) शारीरिक योग्यता चाचणी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गांमधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १ : १० या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरिता बोलावण्यास पात्र असतील.

(ब) लेखी चाचणीमध्ये पुढील विषय समाविष्ट असतील :-

(१) अंकगणित ;

(२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी ;

(३) बुध्दीमत्ता चाचणी ;

(४) मराठी व्याकरण.

(क) लेखी चाचणीमध्ये विचारण्यात येणारे प्रश्न बहुपर्यायी प्रकारचे असतील व ती मराठी भाषेत घेण्यात येईल. लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटे इतका असेल.

(ड) उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

**स्पष्टीकरण :–** शारीरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गांमधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदांच्या १ :१० या प्रमाणात लेखी चाचणीसाठी उपस्थित राहण्याकरिता बोलाविण्यास पात्र असतील. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये १० रिक्त पदे व अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये ५ रिक्त पदे असतील तर, अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार १०० (१० X १०=१००) उमेदवार, सूचीबध्द करण्यात येतील आणि अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार ५० (१० X ५=५०) उमेदवार, सूचीबध्द करण्यात येतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळाले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीस बसण्यासाठी बोलवण्यास पात्र असतील. तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळाले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत लेखी चाचणीस बसण्यासाठी बोलावण्यास पात्र असतील.

**(३)** पोलीस महासंचालक यांनी प्रत्येक पोलीस घटकासाठी गठीत केलेले निवड मंडळ, या नियमाचे पोट नियम (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधून एक गुणवत्ता यादी तयार करील. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळविलेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक - पोलीस-१८१९/ प्र.क्र.३१६/ पोल-५अ, दि.१० डिसेंबर, २०२० मध्ये आणि त्यानंतरच्या शासनाने वेळोवेळी काढलेल्या कोणत्याही आदेशानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी,**
शासनाचे सह सचिव

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032

Dated the 23rd June, 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCR-1818/CR-313(Part-II)/Pol-5A.—In exercise of the powers conferred by clause (b) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (First Amendment) Rules, 2022.

2. For rule 4 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, the following shall be substituted, namely :—

**"4. (1) Physical Test (50 marks) :—**

The candidates who fulfill the physical and educational qualification shall be required to appear for physical fitness test. The physical Fitness test will be of total 50 marks as follows, namely :—

| | | |
|---|---|---|
| **(A)** | **Male Candidates** | **Marks** |
| (a) | 1600 Meters running | 20 |
| (b) | 100 Meters running | 15 |
| (c) | Shot put | 15 |
| | **Total** | **50** |
| **(B)** | **Female Candidates** | **Marks** |
| (a) | 800 Meters running | 20 |
| (b) | 100 Meters running | 15 |
| (c) | Shot put | 15 |
| | **Total** | **50** |

**(2) Written Test (100 Marks) :—**

(A) Candidates securing a minimum of 50 percent marks in Physical Fitness Test shall be eligible to be called to appear for a written test of 100 marks in the ratio of 1:10 of vacancies advertised in the respective categories.

(B) The Written Test shall include the following subjects, namely:—

(1) Arithmetic;

(2) General Knowledge and Current Affairs;

(3) Intelligence Test;

(4) Marathi Grammar.

(C) The questions asked in written test shall be multiple choice questions type and conducted in Marathi language.The duration of Written Test will be 90 minutes.

(D) Candidates are required to get atleast 40 percent marks in the written test. The candidates securing less than 40 percent marks in written test will be considered as ineligible.

*Explanation.*— Candidates securing a minimum of 50 percent marks in the Physical Fitness Test shall be eligible to be called to appear for a written test in the ratio of 1:10 of the vacancies advertised in the respective catagories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste category and 5 vacancies in the Scheduled Tribes category, then 100 (10 X 10 = 100) candidates shall be listed on merit in the Scheduled Caste category and 50 (10 X 5=50) candidates, shall be listed in the Scheduled Tribes category. However, all candidates in the Scheduled Caste category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 100th rank shall be eligible to be called to appear for a written test. Similarly, all Scheduled Tribes category candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 50th will be eligible to be called to appear for a written test.

**(3)** The Selection Board of every Police Unit constituted by the Director General of Police shall prepare a merit list from amongst the candidates based on the results of the two criteria mentioned in sub- rules (1) and (2) of this rule. After amalgamation of marks obtained in Physical Test and Written Test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Home Department's Governments Resolution No. Police-1819/CR-316/ Pol-5A, dated 10th December, 2020 and any subsequent orders issued by the Government, from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. E. KULKARNI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १४१(२)]    शुक्रवार, ऑक्टोबर ४, २०२४/आश्विन १२, शके १९४६    [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३७३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक सेप्रनि-११२४/प्र.क्र. २८५/पोल-५अ.— महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२४, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ याच्या नियम ३ मध्ये, पोट-नियम (२) मधील,—

(१) खंड (अ) मध्ये, उप-खंड (ब) मधील, परिच्छेद (i) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :–

" परंतु, अनुसूचित जमातींतील उमेदवारासाठी, आवश्यक असलेली उंची, ५ सेंटीमीटरने शिथिल करण्यात येईल.".

(२) खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :–

"**(इ) अनुसूचित जमातींसाठी विशेष तरतुदी :–** जे उमेदवार, आवश्यक पात्रता शर्तींची पूर्तता करतात अशा अनुसूचित जमातींतील उमेदवारांना, आवश्यक असलेल्या उंचीमध्ये, ५ सेंटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. ह. कदम,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 4th October, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. RCR-1124/C.R.285/Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2024.

**2.** In rule 3 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011 in sub-rule (2),—

(*i*) in clause (*A*), in sub-clause (*b*), in para (*i*) the following proviso shall be added namely :–

"Provided that, for candidate belonging to Scheduled Tribes, the required height shall be relaxed by 5 centimeters.".

(*ii*) after clause (*D*), the following clause shall be added, namely :–

"*(E) special provisions for Scheduled Tribes*.— Relaxation in the required height by 5 centimeters shall be given to the candidates belonging to Scheduled Tribes, who fulfills the other required eligibility conditions.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. H. KADAM,
Deputy Secretary to Government.

## गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम.**

क्रमांक सेप्रनि-११२४/प्र.क्र. २८५/पोल-५अ.— महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम (१९५१ चा ३८) याच्या कलम २१ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

**१.** या नियमांस, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२४, असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ याच्या नियम ३ मध्ये, पोट-नियम (२) मधील,—

(१) खंड (अ) मध्ये, उपखंड (२) मधील, परिच्छेद (अ) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, अनुसूचित जमातींतील उमेदवारासाठी, आवश्यक असलेली उंची, ५ सेंटीमीटरने शिथिल करण्यात येईल.".

(२) खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"**(इ) अनुसूचित जमातींसाठी विशेष तरतुदी :-** जे उमेदवार आवश्यक पात्रता शर्तींची पूर्तता करतात अशा अनुसूचित जमातींतील उमेदवारांना, आवश्यक असलेल्या उंचीमध्ये, ५ सेंटीमीटर इतकी शिथिलता देण्यात येईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. ह. कदम,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 4th October, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE RESERVE POLICE FORCE ACT.

No. RCR-1124/C.R.285/Pol-5A.— In exercise of the powers conferred by clause (*c*) of sub-section (*2*) of section 21 of the Maharashtra State Reserve Police Force Act (XXXVIII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment ) Rules, 2012, namely :—

**1.** These rules may be called the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) (Amendment) Rules, 2024.

**2.** In rule 3 of the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment ) Rules, 2012, in sub-rule (2),—

(*i*) in clause (*A*), in sub-clause (*b*), in para (*i*) the following proviso shall be added namely :–

"Provided that, for candidate belonging to Scheduled Tribes, the required height shall be relaxed by 5 centimeters.".

(*ii*) after clause (*D*), the following clause shall be added, namely :–

"*(E) special provisions for Scheduled Tribes.*– Relaxation in the required height by 5 centimeters, shall be given to the candidates belonging to Scheduled Tribes, who fulfills the other required eligibility conditions.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. H. KADAM,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३३] गुरुवार, ऑक्टोबर २०, २०२२/आश्विन २८, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑक्टोबर २०२२.

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक पोलीस-१८२०/प्र.क्र.१४९/पोल-५अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम, २०२२, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ याच्या नियम ८ मधील, पोट-नियम (तीन-अ) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल:–

"(तीन-अ) राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) "क" प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार, पाच अधिकच्या (बोनस) गुणांसाठी पात्र असतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी**
शासनाचे सहसचिव.



Scanned with CamScanner

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th October 2022.

## ORDER

MAHARASHTRA POLICE ACT.

No. Police-1820/C.R.-149/Pol-5A.—In exercise of the powers conferred by clause (*b*), section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :–

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Second Amendment) Rules, 2022.

2. In rule 8 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, for sub-rule (*iii-a*), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(*iii-a*) The candidates possessing National Cadet Corps (NCC) "C" certificate shall be eligible for five bonus marks."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A.E. KULKARNI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३८(१०)] गुरुवार, नोव्हेंबर ३, २०२२/कार्तिक १२, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर २०२२.

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक पोलीस-११२२/प्र.क्र.२२ /पोल-५ अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २०२२, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ याच्या नियम ३ मध्ये, पोट-नियम (१) मधील खंड (अ) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल : —

" परंतु, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे, १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गांचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदांसाठी सन २०२० व २०२१ या कॅलेंडर वर्षांतील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेसाठी, एक वेळची उपाययोजना म्हणून, पात्र असतील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी,**
शासनाचे सहसचिव.





Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 03 November 2022.

*ORDER*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. POLICE-1122/C.R.22/POL-5A.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Third Amendment) Rules, 2022.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, in sub-rule (1), in clause (A), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, due to Covid - 19 pandemic, the candidates of all categories who have crossed the upper age limit during the period 1st January 2020 to 31st December 2022 shall be eligible for recruitment process to be conducted for filling up vacancies of the calendar year 2020 and 2021 for the said post by selection, as a one-time measure.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. E. KULKARNI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner